जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मंगळवार दि.२९ ऑक्टोबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : ५५
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com
Lokneta News - लोकनेता न्युज
8459977904
epaper.lokneta.in

## भाजप महाराष्ट्रात स्वबळावर जिंकू शकत नाही

# पण सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास येईल देवेंद्र फडणवीस यांच्या विधानाची चर्चा

लोकनेता न्यूज नेटवर्क


मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात भारतीय जनता पक्ष स्वबळावर जिंकू शकत नाही. पण तो सर्वात मोठा पक्ष म्हणून निश्चितच पुढे येईल, असे महत्त्वापूर्ण विधान भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी हे विधान केल्यामुळे त्याची राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

देवेंद्र फडणवीस एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले की, राज्यात भाजप स्वबळावर विधानसभा निवडणूक जिंकू शकत नाही. पण आमच्याकडे सर्वाधिक जागा व सर्वाधिक मतांची टक्केवारी आहे. वस्तुस्थिती व नेमकी परिस्थिती काय आहे? याविषयी आपण व्यावहारिक असले पाहिजे. त्यामुळे निवडणुकीनंतर भाजप राज्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास येईल. तिन्ही पक्षांच्या मतांचे एकत्रीकरणच आम्हाला निवडणुकीत विजयी करू शकेल.

देवेंद्र फडणवीस यांनी जागावाटपाच्या चर्चेतील नेत्यांची नाराजी व बंडखोरीवरही भाष्य केले. जागावाटपाच्या मुद्यावर कुणीही तडजोड करण्यास तयार नाही. त्यामुळे यावेळी ज्या नेत्यांना निवडणूक लढवण्याची संधी देता आली नाही त्या आमच्या काही महत्त्वकांक्षी नेत्यांसाठी मला वाईट वाटते. फडणवीस यांनी यावेळी विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीचेच सरकार सत्तेत येणार असल्याचा दावाही केला. तसेच लोकसभा निवडणुकीतील निकालाचा विधानसभा निवडणुकीच्या निकालावर कोणताही परिणाम पडणार नाही असेही जोर देवून सांगितले.उल्लेखनीय बाब म्हणजे विधानसभा निवडणुकीसाठी सत्ताधारी महायुतीतील भाजपने आतापर्यंत १२१ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने ४५, तर राष्ट्रवादी काँग्रेसने ४९ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. महायुतीच्या घटकपक्षांत अजून ७३ जागांवर चर्चा सुरू आहे. या जागांवर चर्चा करण्यासाठी रविवारी सायंकाळी देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर महायुतीच्या नेत्यांची बैठक झाली. त्यात यापैकी काही जागांवर तोडगा निघाल्याची चर्चा आहे. पण त्याची पुष्टी होऊ शकली नाही.

दरम्यान, महाराष्ट्रात येत्या २० तारखेला विधानसभा निवडणुकीचा फड रंगणार असून, २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. तत्पूर्वी २०१९ च्या निवडणुकीत भाजपला सर्वाधिक १०५ जागा मिळाल्या होत्या. त्यावेळी शिवसेना - भाजपची युती होती. शिवसेनेला ५६ जागा मिळाल्या होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसला ५४ तर काँग्रेसला ४४ जागांवर समाधान मानावे लागले होते.



## मुखेड पं.स सहाय्यक गटविकास अधिकारी पदी धनाजी धर्मेकर



लोकनेता न्यूज नेटवर्क

मुखेड । शिवकुमार बिरादार

पंचायत समिती विभागाचे विस्ताराधिकारी धनाजी धर्मेकर यांची सहाय्य गटविकास अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. धनाजी धर्मेकर यांची सहाय्य व्हिडिओ म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल गटविकास अधिकारी सी.एल. रामोड व ग्रामसेवक संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष नजीरसाब सय्यद, पी.जे. नागेश्वर व ग्रामसेवक संघटना कर्मचारी संघटना यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कनिष्ठ लेखा अधिकारी गणेश मुगावे, कर्मचारी संघटनेचे तालुकाध्यक्ष मनोज राठोड, विस्तार अधिकारी पी.एन. गजे, ग्रामसेवक संघटनेचे सचिव सतीश गायकवाड, कुंदन बनसोडे, विजयकुमार घाळे, वाहन चालक गंगाधर हिगरूपे, बालाजी गुंटुरे यांच्यासह कर्मचारी व पत्रकार मंडळी यांच्यावतीने पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## नांदेड लोकसभा पोटनिवडणुक व नऊ विधानसभा निवडणुकीत मांतग समाज अपक्ष उमेदवार उभे करणार-मा.आ.अविनाश घाटे

लोकनेता न्यूज नेटवर्क

बिलोली । गौतम गावंडे



संपूर्ण महाराष्ट्रात विधानसभा सार्वत्रिक निवडणुका जाहिर झाल्या आहेत.महाविकास आघाडी व महायूतीचे उमेदवार व जागा जवळजवळ वाटप करण्यात आलेले आहेत. नांदेड जिल्ह्यातील लोकसभा पोटनिवडणुक व नऊ विधानसभा या ठिकाणी एकही उमेदवार मातंग समाजाचा दिला नाही म्हणून मा.आ.अविनाश घाटे यांच्या निवासस्थानी सकल मातंग समाजाची बैठक झाली. यामध्ये सर्वानुमते लोकसभेसाठी व नऊ ठिकाणी विधानसभा अपक्ष उमेदवार उभे करणार आसल्याचे मा,आ,अविनाश घाटे यानी भावना व्यक्त केली आहे.

महाराष्ट्रासहीत नांदेडसह मातंग समाजाचा राजकारणात वेळोवेळी वापर करुन घेतला जात आहे..आम्हाला कोणीही गृहित धरुन स्वतः चा व त्या पक्षाचा फायदा करुन घेत आहेत... बैठकीत अनेकानी व्यथा मांडली मी समाजासोबत सदैव आहे म्हणून समाजाच्या भावनांचा आदर करुन नांदेड लोकसभा पोटनिवडणूकित उमेदवार म्हणून मा,जि.प.अध्यक्ष प्रतिनिधी अंनदराव गुंडीले तर बिलोली-देगलुर राखीव विधानसभा मधुन मि स्वतः अविनाश घाटे उमेदवारी आर्ज दाखल करणार आहोत व बाकी नायगांव, लोहा, भोकर, नांदेड दक्षिण, नांदेड उत्तर, आणि मुखेड विधानसभा ठिकाणाहून जे सक्षम उमेदवार असतील त्याना उमेदवारी देऊन उभे करणार आसल्याचे मत यावेळी मा,आ,अविनाश घाटे यानी व्यक्त केले आहे.

या बैठकीत मुखेड-देगलुर चे माजी आ.अविनाश घाटे ,माजी सनदी अधिकारी व्ही,जे.वरवंटकर.जि.प.माजी अध्यक्ष प्रतिनिधी आनंदराव गुंडीले.मा.जि,प सभापती प्रा.बाबुराव पवित्रे.मुखेड मा.नगरध्यक्ष गणपतराव गायकवाड. अण्णाभाऊ साठे क्रांती आंदोलन अध्यक्ष सतिश कावडे. लोकस्वराज्य आंदोलन संस्थापक अध्यक्ष प्रा.रामचंद्र भराडे.गणेश तादलापूरकर, प्रा.सदाशिव भुयारे, प्रा.देविदास इंगळे यशवंत महाविद्यालय नांदेड, बळवंतकुमार शिंदे उपाध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस, बी.बोरगावकर. कॉ.गंगाधर गायकवाड.चंद्रकांत घाटे.नागेश तादलापुरकर.राजेन्द्र मंडगीकर, आनंदराव भंडारे, प्रा.शिवाजी सूर्यवंशी, हाणमंत माळेगावकर,गंगाधर राणवळकर, प्राचार्य तथा सरपंच डाँ.मनोहर तोटरे अदि मातंग समाजाचे प्रमुख पदधिकारी कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

## किनवट माहुर विधानसभा मतदारसंघातून भिमराव केराम यांनी केला उमेदवारी अर्ज दाखल




लोकनेता न्यूज नेटवर्क । माहूर । योगेश चव्हाण

किनवट विधानसभेतून भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गट तसेच मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार श्री भीमराव केराम साहेबांनी हजारो कार्यकर्त्यांच्या सोबत त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

## खा.अशोकराव चव्हाण यांना अविनाश राठोड यांनी दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा



लोकनेता न्यूज नेटवर्क । माहूर । योगेश चव्हाण

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार माननीय श्री अशोकरावजी चव्हाण साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना भारतीय जनता पार्टीचे लोकप्रिय आणि धाडसी नेता एडवोकेट आविनाशभाऊ राठोड़ किनवट,माहुर

## काटकळंबा येथील कै.गंगाराम केरबाजी तेलंगे यांचे अल्पशा आजाराने निधन

लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे



कंधार तालुक्यातील काटकळंबा येथील पत्रकार दिगंबर तेलंगे, बालाजी तेलंगे, पैलवान दत्ता तेलंगे यांचे वडिल कै.गंगाराम केरबाजी तेलंगे यांचे दि.२८ ऑक्टोबर रोजी दुपारी वयाच्या ७५ व्या वर्षी रहात्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले आहे त्यांचा अंत्यसंस्कार दि.२९ ऑक्टोबर रोज मंगळवार दुपारी १ वाजता काटळंबा येथील त्यांच्या शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी,तीन मुले ,दोन मुली,नातू ,पन्तू असा मोठा परिवार आहे.

## शेकापकडून सौ.आशा ताई शिंदे आज उमेदवारी अर्ज दाखल करणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

लोहा । विशाल घंटे



लोहा ८८ विधानसभा मतदारसंघातून शेतकरी कामगार पक्षाकडून सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शामसुंदर शिंदे ह्या दि. २९ ऑक्टोबर रोजी भव्य शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

मंगळवारी दि. २९ रोजी लोहा शहरातील शनी मंदिर येथून भव्य रॅलीस प्रारंभ होणार असून ही रॅली तहसील कार्यालयासमोर येणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आशाताई यांची शहरातील सहारा मैदान येथे भव्य जाहीर सभा होणार आहे. या जाहीर सभेला माजी आमदार शामसुंदर शिंदे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे सह आदी मान्यवर संबोधित करणार आहेत. आशाताई शिंदे यांचा उमेदवारी फॉर्म भरण्यासाठी लोहा व कंधार तालुक्यातील शेकापच्या महिला भगिनी हजारो कार्यकर्ते उपस्थित राहणार असून या जाहीर सभेला मतदारसंघातील महिला भगिनी कार्यकर्ते पदाधिकारी यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने करण्यात आले.

## दरबार ए शायरी

एक मत तुमचे जर असले
हलून जाईल सिंहासन !
मत बदलले लोकांचे तर
बदलून जाईल दु:शासन !!

डॉ.विजयकुमार कस्तुरे,
ॲडव्होकेट, चिखली.

## चारोळी

दिवाळी सण येता
येई आनंदाला भारती
एक होई सारे जण
मग भेदभाव कशास उरती.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## राष्ट्रीय काँग्रेस कडून साहेबराव कांबळे यांनी हजारोच्या कार्यकर्त्याच्या साक्षीने भरला नामांकन उमेदवारी अर्ज

लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड । सय्यद रहीम रजा

उमरखेड विधानसभा ८२ क्षेत्रामध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून साहेबराव कांबळे यांनी हजारो कार्यकर्त्याच्या साक्षीने उमेदवारी नामांकन अर्ज आज दाखल करण्यात आला.राजस्थान भवन येथे नामांकन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मत व्यक्त केले होते. सदर रॅली ही महागाव रोड वरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर लगेच छ.शिवाजी महाराज चौक येथील छ.शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुसद रोडवरील तहसील येथे संपन्न करण्यात आली. सदर रॅलीमध्ये साहेबराव कांबळे तुम आगे बढो.! हम तुम्हारे..!!साथ है जीतेंगा भाई जीतेंगा..साहेबराव कांबळे जीतेंगा असे नारे सर्व कार्यकर्ते देत होते. उमरखेड महागाव विधानसभा क्षेत्रामध्ये मागील दोन वर्षा पासून साहेबराव कांबळे यांनी प्रत्यक्ष गाव भेट करून प्रत्येक नागरिकांच्या मनामध्ये आपले घर निर्माण केले आहे. आणि काँग्रेस पक्षाला जिवंत ठेवण्याचे मोठे काम केले आहे.साहेबराव कांबळे यांनी विविध सामाजिक कार्याचा पुढाकार घेऊन गरजूंना मदत करण्याची ठाम निर्णय घेऊन सर्वांना मदत करत होते आणि करत आहेत. गोपाल अग्रवाल यांच्या पुढाकाराने अथांग प्रयत्नातून तकांबळे यांना राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळाल्यामुळे त्यांनी उमेदवारी नामांकन अर्ज दाखल केल्यामुळे सर्व कार्यकर्त्या व पदाधिकाऱ्यांच्या नवा जोश निर्माण झालेला आहे. उमरखेड विधानसभा क्षेत्रातील सर्व नागरिक हे साहेबराव कांबळे यांच्या सोबत आहेत अशी अनेक सामान्य नागरिकांनी आपले मत व्यक्त केले आहे. यावेळी प्रामुख्याने ज्येष्ठ नेते नंदकिशोर अग्रवाल, तातू देशमुख, राम देवसरकर, जिल्हा परिषदेचे माजी सभापती डॉ. नदीम, बाळू पाटील चंद्रे माजी सभापती, गोपाल अग्रवाल,सोनू खतीब.



# जोरदार शक्ती प्रदर्शन करीत मा.आ. रमेश थोरात यांनी केला अर्ज दाखल

## ४० वर्ष सतत जनतेसाठी काम करत आलो माझ्यासाठी २०/२२ दिवस काम करा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटामध्ये अजित पवार यांचे निकटवर्तीय पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष व दौंड तालुक्याचे माजी.आमदार रमेश थोरात यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार गटांमध्ये प्रवेश केला असून त्यांना दौंड तालुक्यातून विधानसभेसाठी उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. २८ ऑक्टोबर रोजी रमेश थोरात यांनी कार्यकर्ते व पक्षाचे पदाधिकारी यांचे समवेत जोरदार शक्ती प्रदर्शन करीत, जेसीबी वरून फुलाची उधळण करीत, वाजत गाजत छत्रपती शाहू महाराज चौक,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक, महात्मा गांधी चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.यावेळी हजारोच्या संख्येने कार्यकर्ते,पदाधिकारी उपस्थित होते.उमेदवारी अर्ज दाखल करून छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सभा घेण्यात आली.

दौंड तालुक्यातील आजी- माजी सरपंच,उपसरपंच,सर्व सेलचे अध्यक्ष,उपाध्यक्ष अनेकांनी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार यांनी रमेश थोरात यांच्यावर दाखवलेला विश्वास सार्थ करावा राम कृष्ण हरी,वाजवा तुतारी हुकमी एक्का रमेश आप्पा अशा घोषणा देत जास्तीत जास्त मतदान तूतारी वाजवणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून मतदान करावे.खरं बोलणे ही काही टिका नाही आणि खऱ्याला मरण नसतं,अशा प्रकारचे बोचरी टीका कार्यकर्त्यांनी केली.खोटे गुन्हे दाखल करणे,दडपशाही करणे,तालुक्याचा विकास न करता,पोकळ गप्पा मारणे, अशी अनेकांनी आपल्या भाषणामध्ये जहाल टाका कली.पाच वर्षे आमदारकी व जिल्हा बँक अध्यक्ष म्हणून काम करून देशात व राज्यात पुणे जिल्हा बँक एक नंबर वरती नेहून पोहचवली आहे.देशात व राज्यात नावारूपाला आणली.असे माजी आमदार रमेश थोरात म्हणाले.दौंड तालुक्यात सर्वांची कामे गेली ४० वर्षे गट-तट न पाहता करत आलो आहे. माझ्यासाठी फक्त २०/२२ दिवस काम करा मी तुमच्यासाठी पाच वर्षे काम करीन.नामदेव ताकवणे,आप्पासाहेब पवार,सोहेल खान,दिग्विजय जेधे, रामभाऊ टुले,वंदना मोहिते,खळदकर यांनी मोठेपणा दाखवून मला शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारी मिळवून देण्यासाठी मदत केली आहे.त्यांचे देखील मनापासून आभार मानतो. प्रत्येक माणसाचं काम करणे,चांगल्याला चांगलं म्हणा,वाईट ला वाईट म्हणा...अशा शब्दात रमेश थोरात यांनी आपले मत व्यक्त केले.






## लोकनेताच्या टवाळक्या

**मित्रहो...**

निवडणुका जवळ आल्या की नेत्यांचं कामच असत गाडीत भाकरी खाऊन व्हिडिओ व्हॉइरल करण..
एरव्ही ते कोणत्या ५ स्टार ला जेवायला असतात त्याची तुम्हाला कल्पना आहे का ?



ज्ञानेश्वर सुरेश बुधवत
मुख्यसंपादक दैनिक लोकनेता
संस्थापक - विश्व फाउंडेशन म. राज्य
मातृतीर्थ सिंदखेड राजा
मो. न. ९९६०२०९१४९



मुखेड- कंधार मतदार संघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ.तुषार गोंवीदरराव राठोड यांनी नामाकंन अर्ज दाखल केला यावेळी उपस्थित निवडणूक निर्वाचन अधिकारी अनूप पाटील,सहाय्यक निवडणुक अधिकारी तहसिलदार राजेश जाधव,संतोष बोनलेवाड नासिर पठाण अशोक गज्जलवाड उपस्थित होते.

## उदगीर व जळकोट मतदार संघात 'विजय संकल्प मेळावा'

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । प्रतिनिधी**

रोजी उदगीर आणि जळकोट मतदार संघाच्या वतीने 'विजय संकल्प मेळावा' साजरा करण्यात आला. या मेळाव्यात प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थिती दर्शवली, ज्यामुळे मी भारावून गेलो.

या मेळाव्यात माजी कॅबिनेट मंत्री ना. संजय बाबुराव बनसोडे यांनी गेल्या पाच वर्षांत केलेल्या कार्याची ही पावती होती. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मी त्यांच्या प्रेम आणि जिव्हाळ्याबद्दल आभार व्यक्त केले. मला दिलेला विश्वास मी पूर्ण केला आहे आणि उदगीरच्या विकासात झालेला बदल आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे शक्य झाला आहे.

आता पुढील पाच वर्षांत उदगीर-जळकोटचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी मला तुमच्या सहकार्याची आवश्यकता आहे. एकत्र येऊन विकासाच्या दिशेने एकजुटीने काम करणे आवश्यक आहे. उदगीर व जळकोटचे भविष्य आमच्या हातात आहे, आणि विकासाची नवी कहाणी आपण सर्वांनी एकत्रितपणे लिहित जाऊ.मी माझ्या मतदार संघामध्ये विकासपर्व आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. तुम्हा सर्वांचा मोलाचा साथ मला मिळत आहे,

# गायत्री शिंगणे यांचा अपक्ष अर्ज दाखल





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

विधानसभा २०२४ च्या अर्ज दाखल करण्यासाठी आज सिंदखेड राजा मतदार संघामध्ये गायत्री शिंगणे यांनी त्यांच्या हजारो समर्थकांसोबत अपक्ष अर्ज दाखल केला असून.

गायत्री शिंगणे या मागील दोन तीन वर्षा पासून मतदार संघात नागरिकांच्या प्रश्नासाठी सातत्याने आवाज उठवत असून त्या राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेतृत्व करत होत्या, परंतु आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी मागील आठवड्यात अजितदादा पवार गटातून शरद पवार गटात प्रवेश केल्यामुळे त्यांना उमेदवारी जाहीर होणार नाही म्हणून त्या अजित पवार गटात गेल्या. तरी देखील त्यांना उमेदवारी मिळण्याची संकेत नसल्यामुळे मुळे आज त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

### गायत्री शिंगणे यांचा अर्ज दाखल करतेवेळी समर्थकांची गर्दी

**अर्ज दाखल करतेवेळी गायत्री शिंगणे यांच्या हजारो समर्थकांनी गर्दी केल्याचं दिसून आले. गेल्या अनेक वर्षा पासून मतदार संघात विकास कामे न झाल्याने, मतदार संघातील तरुणांवर बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यासाठी मी पुढील काम करणार असून, अनेक वर्षा पासून बंद असलेल्या जिजामाता सहकार साखर कारखण्याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केला. मतदार संघात एम आय डी सी आणणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

### शक्ती प्रदर्शन करत अनुराधा नागवडे यांनी तर

# साधेपणाने धनशाम शेलार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा. नगर श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघात आघाडीच्या ठाकरे गटाकडून मोठ्या प्रमाणात शक्ती प्रदर्शन करत साजन पाचपुते व बाबासाहेब भोस यांच्या प्रमुख उपस्थितीत अनुराधा नागवडे यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला या वेळी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून घोषणा देत परीसर दणानुन टाकला तर आमदार बच्चु कडु यांच्या प्रहार संघटनेच्या वतीने घनश्याम शेलार यांनी साध्या पध्दतीने कुठलेही शक्ती प्रदर्शन न करता आपला उमेदवारी अर्ज दाखल केला या वेळी बोलताना अनुराधा नागवडे म्हणाल्या की विजय हा आपलाच होणार आहे तर घनश्याम शेलार यांनी ही विजयाचा दावा केला आहे यावेळी बोलताना शेलार म्हणाले की माजी लढाई तालुक्यातील साखर सम्राटांविरोधात आहे आणि ही लढाई मी जिंकणारच आहे एकंदरीत पाहता सर्वच उमेदवार विजयाचे दावे प्रति दावे करताना दिसत आहेत सेवटी मतदार हा राजा आहे तो कोणाच्या गळ्यात विजयाची माळ टाकणारं ते निकाला नंतरच समजणार आहे हे मात्र नक्की...

## आमदार राहुल कुल आज उमेदवारी अर्ज दाखल करणार

### गोपीचंद पडळकर,योगेश टिळेकर, परशुराम वाडेकर राहणार उपस्थित



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

मंगळवार (दि.२९) रोजी सकाळी ११ वाजता भाजपा महायुतीच्यावतीने उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची माहिती दौंडचे आमदार राहुल कुल यांनी दिली.याबाबत बोलताना म्हणाले की गेल्या दहा वर्षात मी दौंड तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न केला असून कोट्यवधी रुपयांची विकासकामे मतदारसंघात केली आहेत.

हाच निकष ठेवून भाजप आणि मित्रपक्षांनी मला पुन्हा एकदा निवडणूक लढवण्याची संधी दिली असून त्यानुसार मी मंगळवारी विधान परिषद सदस्य गोपीचंद पडळकर,योगेश टिळेकर व परशुराम वाडेकर यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे.

यावेळी दौंड मधील छत्रपती श्री. शिवाजी महाराज चौकात जाहीर सभा होणार असून तालुक्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी व मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मला आशीर्वाद द्यावे आणि पुन्हा मला काम करण्याची संधी द्यावी असे अवाहन आमदार राहुल कुल यांनी केले आहे.

# दोन एसटी बसची जोरदार धडक झाल्याने दोन प्रवाशांचा मृत्यू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर पाटस आणि वरवंडच्या हद्दीत असलेल्या निसर्ग हॉटेलजवळ दोन एसटी बसची जोरदार धडक होऊन भीषण अपघाताची घटना घडली.अपघातामध्ये एक महिला व एक जेष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला आहे. तर दोन्ही बसमधील ४० ते ४५ प्रवासी जखमी झाले आहेत.ही माहिती पाटस पोलीस उपनिरीक्षक सलीम शेख यांनी दिली.

या मध्ये सुवर्णा संतोष होले (वय३८) राहणार बिरोबावाडी ता.दौंड जिल्हा पुणे) व नामदेव आढाव (वय ७०)राहणार काष्टी,तालुका श्रीगोंदा जिल्हा नगर) दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर राज्य परिवहन विभागाची जामखेड ते स्वारगेट एसटी बस ही पुणे दिशेला जात होती. एक मोटरसायकल आडवी आल्याने बसचालकाने मोटर सायकल चालकाला वाचवण्यासाठी वाहन बाजूला घेत असताना वाहनावरील ताबा सुटल्याने एसटी बस दुभाजक तोडून विरुद्ध दिशेला गेली आणि समोरून येणाऱ्या पुणे- तुळजापूर या बसला जाऊन धडकली.हा अपघात सोमवारी (दि.२८) दुपारी एक ते दिड वाजण्याच्या आसपास पाटस आणि वरवंडजवळ कवठीचा मळा हॉटेल निसर्ग समोर घडला. या अपघातामध्ये मोटर सायकल चालक वाचला,मात्र दोन्ही बसमधील तब्बल ४० ते ४५ प्रवासी जखमी झाले आहेत. जखमी झालेल्या प्रवाशांना वरवंड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र,चौफुला व दौंड येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान सुवर्णा होले व नामदेव आढाव या दोघांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पाटस पोलीस चौकीचे पोलीस उपनिरीक्षक सलीम शेख,सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक भानुदास बंडगर आणि कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.अपघातात दोन्ही एसटी बस समोर समोर धडकल्याने दोन्ही वाहनांचे मोडतोड झाल्याने चेंदामेंदा झाल्याने मोठे नुकसान झाले आहे.याबाबतचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.



# आजी माजी लोकप्रतिनिधीनी फक्त आयत्या पिठावर रेगोट्या ओढण्याचे काम केल-सुरेश धस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**





मतदार संघाच्या विकासात सत्ता असो किंवा नसो आपण कायम मी व माझे कुटूंब काम करीत आहे. परंतु गेल्या दहा वर्षांत दोन्ही ही लोकप्रतिनिधींना सिंफदना तलावाची उंची वाढविता आली नाही.खुंटेफळ साठवण तलावाच्या बाबतीत फक्त आयत्या पिठावर रेघोट्या ओढण्याचे फक्त ह्या आजी-माजी यांनी केले असल्याचा आरोप माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी आ. बाळासाहेब आजबे व माजी आमदार भीमराव धोंडे यांच्यावर नाव न घेता केला आहे.आष्टी विधानसभा मतदारसंघाचा उमेदवारी अर्ज सोमवार (दि.२८) रोजी सुरेश धस यांनी दाखल केल्यानंतर बाजारतळात येथे जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी मंगेश चिवटे, कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, माजी जि.प. सदस्य महेंद्र गर्जे, सलीम जहाँगिर, आष्टी नगर पंचायतचे नगराध्यक्ष जिया बेग, अभिजीत शेंडगे,सुखदेव सानप,रंगनाथ धोंडे, विष्णुपंत चव्हाण यांच्यासह आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. पुढे बोलतांना सुरेश धस म्हणाले,माझ्या आयुष्यातली पहिली निवडणूक आहे.कुणाच्या विरोधात फॉर्म माघारी घेई पर्यंत बोलता येणार नाही. पण मी आता माझ्या वडिलांसारखे काम करत आहे. मी राजकारणाला १९९२ पासुन गावच्या सरपंच पदापासून सुरु केली. ते मी आज तगायत फक्त लोकांचेच कामे मी आणि माझे कुटूंब करित आहे. आणि आष्टी मतदारसंघाची जागा स्व. गोपीनाथ मुंडे यांनी शिवसेनेकडून भाजपासाठी म्हणजे माझ्यासाठी घेतली होती. आणि आता परत यावेळेस पंकजा मुंडे यांनीही स्व.मुंडे साहेबांसारखीच जबाबदारी पार पाडली असेही धस यांनी सांगितले. तलावातील गाळ काढा असे मी २००३ ला म्हणत होते आणि तिचं योजना कॉंग्रेस पृथ्वीराज चव्हाण सरकारने २०१२ साली कार्यान्वीत केली. म्हणजे आपण दहा ते बारा वर्ष आगोदच व्हिजनकेले होते. मी गेल्या दहा वर्षापुर्वी जे काम केले तेवढेच आहेत.उदाहरण देईचे झाले तर सिंदफना तलाव, गहूखेल तलाव,खुंटेफळ तलावाचे काम आहेत त्या परिस्थितीत आहेत. येणा-या दिड वर्षात मी खुंटेफळ साठवण तलावाचे व पाइपलाइन चे काम पुर्ण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.सध्याचे लोकप्रतिनिधी निवडणूका आल्या की,मतदार संघाचा दौरा सुरू करतात अन् निवडणुका संपल्या की एसीत बसतात अन् परत म्हणतात आम्ही गोरगरिबांच्या कामात येतोत असं कुठं जमत असतं का? कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माऊली जरांगे यांनी करून आभार मानले.दुपारी साडेतीन वाजता झाली उमेदवारी जाहीर येथील उमेदवारी ही राष्ट्रवादी कॉंग्रेस ची असल्याने याउमेदवारी ही राष्ट्रवादी कॉंग्रेस ची असल्याने या जागेचा सस्पेन कायम होतादरम्यान उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या सभेतच दुपारी ३.२७ मिनिटांचे उमेदवारी जाहीर झाल्याचे वृत्तवाहिनीवर कळाले अन् सभेत सांगताच एकच जल्लोष कार्यकर्त्यांनी साजरा केला.आणि भाजपाच्या तिस-या यादीत भारतीय जनता पक्षाने सुरेश धस यांची उमेदवारी जाहीर केली.

# माजी सैनिक संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष चुकलवाड यांनी केली उमेदवारी दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार लोहा तालुक्यांतील मागील तीन ते चार वर्षापासून मतदार संघात सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवून नावलौकिकास आलेली माजी सैनिक संघटना आगामी होणारी विधानसभा निवडणूक अपक्ष लढवणार असल्यामुळे मतदारसंघात अनेक पक्षांची डोकेदुखी ठरणार असे चित्र दिसत आहे,

तालुक्यांमध्ये अत्यावश्यक लाईट, पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य या बाबींवर कुठलाच विकास झालेला नसून एवढंच नव्हे तर ज्यांनी आजी-माजी खासदार आमदारांनी अनेक वर्षे सत्ता भोगली त्यांच्याच गावांमध्ये जाण्यासाठी रस्ता नाही त्यांना शिक्षण देता आले नाही त्यांना आरोग्य देता आले नाही हे कंधार तालुक्याचे दुर्दैव आहे.

लोहा-कंधार मतदारसंघाची आणखी वेगळी ओळख करण्याचा निर्धार केला आहे म्हणून माजी सैनिक संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष बालाजी रामप्रसाद चुकलवाड यांचा उमेदवारी अर्ज दि.२८ ऑक्टोंबर रोजी दाखल करण्यात आला.



उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माजी सैनिक संघटनेतर्फे अपक्ष उमेदवार बालाजी चुकलवाड यांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, मी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला असून, लोहा कंधार मतदारसंघातील सुजाण मतदार देखील मोठ्या प्रमाणात अर्ज भरतेवेळी सोबत होते. आम्ही फक्त भरला आहे,बाकी शक्तिप्रदर्शन करण्याची आम्हाला गरज नाही.आम्ही सातत्यानं जनतेसोबत उभे असतो आणि मला खात्री आहे की जनताही आम्हाला साथ देतील. तसेच मी एक साधा कार्यकर्ता असून सर्वसामान्यांचं काम करण्यासाठीच लढतोय, असंही बालाजी चुकलवाड म्हणाले.

कंधार लोहा विधानसभेची उमेदवारी अर्ज दाखल करताना माजी सैनिक संघटनेचे मार्गदर्शक सुभेदार मेजर माधव जायभाये, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील डुमणे, माजी सैनिक संघटनेचे मुखेडचे तालुकाध्यक्ष भगवानराव नागरगोजे, उपाध्यक्ष मोरे पाटील, माजी सैनिक संघटनेचे तालुकाध्यक्ष अर्जुन दादा कांबळे, सचिव पोचीराम वाघमारे,कार्याध्यक्ष गोविंद सूर्यवंशी ,तालुका उपाध्यक्ष संभाजी कल्याणकर,संघटक बापूराव कल्याणकर,सदस्य वडजे, रावसाहेब शिंदे, डिकळे सर, संजय जाधव , गणेश बेंद्रीकर,नारायण किरोळे,भासेवाड सर, मुसंडे सर ज्ञानेश्वर जायभाये ,पाताळगंगा सरपंच प्रतिनिधी राजु मंडे तथा ग्रामपंचायत टीम माजी सरपंच रामप्रसाद चुकलवाड माजी सरपंच उद्धव किरतवाड माजी उपसरपंच बालाजी मुंडे तंटामुक्ती अध्यक्ष आनंदा मुंडे तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्व आजी माजी सैनिक तथा मतदार संघातील मोठ्या प्रमाणात युवा तरुण वर्ग,गावकरी उपस्थित होते.

# छावाचे जिल्हाध्यक्ष सिंदखेडराजा मतदारसंघात भरणार उमेदवारी अर्ज

## सिंदखेडराजा मतदारसंघात प्रस्थापितांना प्रस्थापितांना धक्का बसण्याची शक्यता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात जिल्हाध्यक्ष अशोक राजे जाधव पाटील हे संभाजी राजे पाटील व मनोज जरांगे पाटील यांच्या तिसऱ्या आघाडीतून उमेदवारी अर्ज २९ ऑक्टोबर रोजी अर्ज भरणार असल्याची माहिती आज सिंदखेड राजा येथे त्यांनी दिली याबाबत सविस्तर वृत्त असेही मात्रतीर्थ सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघात सदैव मतदारांच्या संपर्कात राहून सुखदु:खाचे वेळी रात्री आपरात्री केव्हाही फोन करा ते हजर असतात त्यांचा या मतदारसंघात मोठा जनसंपर्क असल्याने छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष असून त्यांनी सामाजिक राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात जनसेवेचे काम केले असल्याने ते मतदार संघातील प्रत्येक गावात त्यांचा मोठा जनसंपर्क असल्याने ही विधानसभा निवडणुकीत ते प्रस्थापित उमेदवारांना



धक्का देणार असल्याचे बोलले जात आहे मतदार संघातील जनतेने त्यांना संभाजी राजे व मनोज पाटील जरांगे या तिसऱ्या आघाडीतून उमेदवारी अर्ज भरण्याचे आवाहन केले त्यानुसार त्यांनी सदर मतदारसंघात मंगळवारी २९ ऑक्टोबर रोजी अर्ज भरणार आहे अशोक राजे जाधव पाटील यांनी अर्ज भरल्यानंतर प्रस्थापित उमेदवारांना मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे त्यांचे आजपर्यंत केलेल्या कार्यानुसार त्यांनी हा उमेदवाराचा विजय नक्की होईल अशी मतदारांची भावणा आहे.

## मातृतीर्थ प्रतिष्ठान : मातृत्वाचा ओलावा

# पळसखेड सपकाळ येथील सेवा संकल्प प्रतिष्ठानला दिवाळीचे एक हजार फराळ पाकीट वाटप



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

सिंदखेडराजा मातृतीर्थ प्रतिष्ठान च्या वतीने २६ आक्टोबर रोजी सेवा संकल्प परिवार पळसखेड सपकाळ येथील माता बांधवांसाठी एक हजार दिवाळी फराळ पाकीट भेट दिले

तसं मातृतीर्थ या नावातच सगळं आलं.. त्यात आलं ममत्व, त्यात आली आपुलकी, त्यात आली स्पष्टता आणि शिस्त, त्यात आले शिवरायांचे शौर्य आणि आऊसाहेबांचे मातृत्व सुद्धा ... असंच एक प्रतिष्ठान आमच्या सिंदखेड राजात आहे, नाव मातृतीर्थ प्रतिष्ठान.

सामाजिक काम तसं रिकामटेकड्यांचं आहे असं अनेक जण म्हणत असतात... काही काम नाही मग करा समाज सेवा असा साधारण समज आहे. मात्र याला फाटा दिला आहे मातृतीर्थ प्रतिष्ठान ने..

कुणी डॉक्टर कुणी इंजिनिअर, कुणी शिक्षक, कुणी व्यावसायिक.. प्रत्येक जण आपआपल्या पेशात व संसारात कमालीचा व्यस्त. तरी ही हे सगळे जण काही वर्षांपूर्वी एकत्र आले आणि त्यांनी काही तरी वेगळं करायचं आहे या भावनेतून हे प्रतिष्ठान सुरु केलं. कुणाला काहीच मागायचं नाही, आपली इच्छा आहे तर आपण मित्र मंडळी मासिक काही पैसे जमा करत जाऊ आणि त्यातून एखाद्या गरजू ला मदत करत जाऊ एवढं मोघम स्वरूप या कामाचं सुरुवातीला होतं.सेवा सफर है अंधेरो का, दिया जलाना हर कदम पर, फिर बहाना क्या बनाना बाती का, जलाना खुद को बाती बनाकर.. याप्रमाणे सर्वांनी आपल्या परीने योगदान देणे सुरु केलं.. दरमहा आपल्या जमाखर्चाचा हिशेब सार्वजनिक करणे सुरु केलं. बघता बघता पसारा वाढत गेला आणि मातृतीर्थ चे सदस्य गण वाढत गेले. आज मातृतीर्थ प्रतिष्ठान चा वटवृक्ष झाला आहे. हात गगनाला भिडले असले तरी या सर्वांचे पाय मातीत घट्ट आहेत हे विशेष.. कामातील सातत्य, प्रामाणिकपणा व पारदर्शकता या त्रयीं वर मातृतीर्थ प्रतिष्ठान आज सेवा संकल्प सारख्या अनेक संस्थांचा आधार बनला आहे. अनेक गोष्टींची मदत हा ग्रुप दरवर्षी अनेक संस्थाना करत असतो. कपडे घेऊन देणे, किराणा साठी मदत, धान्या साठी मदत, मेडिकल हशश्रि, वस्तुरूप व वास्तुरूप मदत अश्या एक ना अनेक प्रकारे मदत ही मंडळी करत असतात. दर दिवाळीला सेवा संकल्प वरील माता बांधवांसाठी मातृतीर्थ प्रतिष्ठान फराळाचं घेऊन येत असतात. काल दि सव्विस ऑक्टोबर दोन हजार चोवीस ला एक हजार दिवाळी फराळ पाकीट त्यांनी आपल्याला भेट दिली. मातृतीर्थ प्रतिष्ठान चा आदर्श अनेक ग्रुप नी घ्यायला हवा... आपली छोटी कृती एखाद्याचं आयुष्य बदलू शकते. मातृतीर्थ परिवाराचे, दात्यांचे वं स्नेहीजणांचे मनापासून खूप खूप धन्यवाद

# भाजपच्या महिला आघाडीच्या प्रदेश अध्यक्षा चित्राताई वाघ यांच्या उपस्थितीत डॉ.पाचपुते यांचा उमेदवारी अर्ज दाखल





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातील भाजपाच्या उमेदवार प्रतिभा बबनराव पाचपुते यांचा भाजपा महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष आमदार चित्राताई वाघ व आमदार बबनराव पाचपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकर्त्यांसह जाऊन साधेपणाने उमेदवारी अर्ज दाखल..

श्रीगोंदा प्रतिनिधी:- श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघात आमदार बबनराव पाचपुते यांनी गेली ४० वर्ष प्रतिनिधित्व करत तालुक्याचा कायापालट केला आहे. तसेच महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून अडीच वर्षाच्या कालावधीत कोट्यवधी रुपयांचा निधी श्रीगोंदा तालुक्याला मिळवून दिला असल्याने या मतदारसंघात भाजपा च्या उमेदवार सौ.प्रतिभा बबनराव पाचपुते या मोठ्या मताधिक्याने विजयी होतील असे प्रतिपादन भाजपा महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष आमदार चित्राताई वाघ यांनी श्रीगोंदा येथे केले.

श्रीगोंदा येथे विधानसभा मतदारसंघातील महायुतीची जागा भाजपाचे आमदार बबनराव पाचपुते हे आजारी असल्याने त्यांच्या पत्नी सौ. प्रतिभा बबनराव पाचपुते यांना उमेदवारी जाहीर केली. सोमवार दिनांक-२८/१०/२०२४ रोजी साध्या पद्धतीने कुठलाही गाजावाजा न करता पाच लोकांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करायचा असे ठरले होते. परंतु हि बातमी तालुक्यात कळताच दादांवर प्रेम करणारे हजारो कार्यकर्ते सकाळीच माऊलीवर हजर झाले व भाजपाच्या उमेदवार प्रतिभा पाचपुते यांनी भाजपा महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष आमदार चित्राताई वाघ व आमदार बबनराव पाचपुते व तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

यावेळी बोलताना चित्राताई वाघ म्हणाल्या कि नेत्यावर एवढे प्रेम करणारे कार्यकर्ते हिच नेत्यांची खरी संपती आहे. पुढे बोलताना त्या म्हणाल्या कि विकी दादांच भाषण ऐकल्यानंतर मला दादांच्या जुन्या भाषणांची आठवण झाली. यावेळी विक्रमसिंह पाचपुते, प्रतिभाताई पाचपुते, आमदार चित्राताई वाघ यांच्यासह लोकप्रिय नेते आमदार बबनरावजी पाचपुते यांनी उपस्थितीत जनसमुदायास संबोधित केले. यावेळी बोलताना दादा आजारी असल्यामुळे अनेक कार्यकर्ते भावूक झाले व अनेकांच्या डोळ्यातून बोलताना पाणी वाहू लागले. उपस्थितीत कार्यकर्त्यांनी विजयी होण्याची खात्री देत एकच वादा बबन दादा, विचार पक्का आमदार आक्का, देख लेना तुम आंखोसे जीत कर आयेंगे लाखोंसे अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

# आज बालाजी पाटील खतगावकर मुखेड येथे उमेदवारी अर्ज दाखल करणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । प्रतिनिधी**

आज बालाजी पाटील खतगावकर आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने मुखेड-कंधार मतदारसंघात परिवर्तनाची एक नवी लाट निर्माण होत आहे. येणाऱ्या काळात बदल हवाच, असा निर्धार मतदारांनी केला आहे. त्यांच्या मताचा आदर करत आपण दिनांक २९ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:०० वाजता आगामी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज बालाजी पाटील खतगावकर दाखल करणार आहेत.तरी आपल्या सर्वांचे आशीर्वाद बालाजी पाटील खतगावकर यांना प्रेरणादायी आहेत. तरी आपण सर्वांनी वेळात वेळ काढून क्रिडा संकुल, बी.एस. एन. एल. ऑफीसजवळ, मुखेड येथे आवर्जून उपस्थित राहावे, अशी नम्र विनंती बालाजी पाटील खतगावकर यांनी मतदार बंधू, आणि बहिणीला केली आहे.हजारोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे बालाजी पाटील यांनी आवाहन केले आले आहे.



# अखेर पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर नागवंशी संघपाल पनाड भरणार मेहकर-लोणार विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज

## एल्गार बैठकीतील सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांचा एकमताने ठराव मंजूर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

नागवंशी संघपाल पनाड यांच्या नेतृत्वामध्ये,सुलतानपूर येथील सुख शांती मंगल कार्यालयामध्ये एल्गार बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीचे मुख्य कारण म्हणजे मेहकर- लोणार विधानसभा निवडणूक लढवण्यासंदर्भात,मेहकर-लोणार विधानसभा लढवण्याचा सर्वानुमते घेतला ठराव, नागवंशी संगपाल पनाड यांच्या नेतृत्वामध्ये मेहकर लोणार विधानसभा लढविण्यासंदर्भात सुख शांती मंगल कार्यालय येथे एल्गार बैठकिचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी आपल्या मनोगतातून निवडणूक लढवण्याचा आग्रह केला, त्यामध्ये मुस्लिम सामाचे नेते तोशिफ अली, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष भाई दिलीप खरात,तालुका अध्यक्ष बळीभाऊ मोरे,वंचित बहुजन आघाडीचे मेहकर आणि लोणार तालुक्यातील ९०% पदाधिकारी उपस्थित होते या पदाधिकाऱ्यांनी आम्ही तुमच्या सोबत तन-मन-धनाने आहोतच, व आम्ही ओट पण देणार आणि नोट पण देणार, सर्वांनी असे ठणकावून








सांगितले. यावेळी मनोगत व्यक्त करताना नागवंशी संघपाल पनाड यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की. आदरणीय बाळासाहेब आंबेडकर व राजगृहाबद्दल शेवटच्या श्वासापर्यंत अदराचे स्थान आहे. परंतु बाळासाहेब आंबेडकर यांच्या अवतीभवती जी चांडाळ चौकडी म्हणजे जिल्हा प्रभारी धैर्यवर्धन पुंडकर, अशोक सोनोने, राजेंद्र पातोडे, सविता मुंढे ,निलेश जाधव, यांनी पक्ष विकण्याचे काम केले व पक्ष संपवण्याचे काम करत आहेत. मला त्यानी वेळोवेळी पदापासून दूर ठेवले, पदापासून अनेक वेळा डावलण्याचे काम केले, व मला वेळोवेळी अपमानित करून संपविण्याचे करण्याचे काम केले. यांनीच माझ्याबद्दल बाळासाहेबापर्यंत चुकीचे माहिती दिली,व मला उमेदवारी सुद्धा मिळू नये यासाठी सुद्धा प्रयत्न केले. त्यामुळे नाईलाजास्तव आज रोजी मला एल्गार बैठक घ्यावी लागत आहे. असो परंतु मेहकर-लोणार मतदार संघाचा खुंटेला विकास करण्यासाठी आपण सर्वांनी स्वतःचे जबाबदारी समजून या निवडणुकीमध्ये उतरून मला निवडून आणण्यासाठी रात्रीचा दिवस करून दिवसाची रात्र करून प्रयत्न करावे, व येणाऱ्या काळामध्ये मेहकर-लोणार मतदारसंघातला शैक्षणिक, आर्थिक ,सामाजिक विकास करून घ्यावा असे मत व्यक्त केले. यावेळी मनोगत व्यक्त करण्यासाठी उपस्थित युवा नेते अनित्य घेवंदे,प्रा. डॉ .केबी इंगळे,शाकीरभाई पठाण, दीपक अंभोरे, शेख अख्तर भाई,दीपक पाडमुख, सिद्धार्थ अवसरमोल, महेंद्र मोरे, ग्रामपंचायत सदस्य शे. अमिर भाई ,संतोष भाऊ शिंदे, सुमनबाई पनाड, संतोष पाटील, सद्दाम भाई, जितू डोंगरदिवे, मनोज भालेराव, पत्रकार किशोर मापारी,वाशिम भाई पत्रकार वसीम भाई पत्रकार , शरद अवचार, सागर आत्माराम पनाड, संगम मोरे, श्याम कटारे, नागशेन पनाड,परसराम जावळे,बिंबिसार पनाड, शुध्दोधन सरदार, सोनू पनाड, प्रसेंजीत पनाड ,श्रीराम पनाड ,बबन पनाड, रमेश अवसरमल, मनोहर पनाड ,संजय पनाड, दादाराव पनाड ,संजय शेजूळ, सतीश पवार, शिवाजी नवघरे, विलास खरात, बगलासेठ ,महेश मोरे, संजय शेजुळ, शेख राजू शेख सुबान ,सरकटे साहेब ,साळवे साहेब, पारस पनाड, हरणाबाई चव्हाण ,आत्माराम पनाड,रेशमाबाई पनाड, शांताबाई पनाड, शकुंतलाबाई जावळे, सिंधुबाई पनाड ,मथुबाई सभादिंडे,हरणाबाई चव्हाण उषाबाई पनाड, चंद्रभागाबाई मुळे, अंसाबाई जावळे, छायाबाई पनाड ,अस्मिता पनाड ,केसरबाई गवई,कमलबाई शेजुळ, रुक्मिनाबाई पनाड ,नंदाबाई पनाड शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ओबीसी बहुजन आघाडीकडून चंद्रसेन पाटील यांना उमेदवारी जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

लोहा - कंधार विधानसभेसाठी ओबीसी बहुजन आघाडीने माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड.चंद्रसेन पाटील सुरनर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. पहिल्यांदाच ते लोहा विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत.

ॲड.चंद्रसेन पाटील सुरनर हे माळाकोळी (ता.लोहा) जिल्हा परिषद गटाचे सदस्य होते. त्यांनी या सर्कलमध्ये सर्वाधिक विकास कामे केली आहेत.गौंडगावचे सरपंच,नांदेड रेल्वे बोर्ड समितीचे सदस्य, धनगर समाज संघर्ष समितीचे उपाध्यक्ष, धनगर समिती विकास परिषदेचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. सध्या लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व लोहा संजय गांधी निराधार समितीचे ते अध्यक्ष आहेत. कंधार पंचायत समितीचे उपसभापती कै.व्यंकटराव गुंडेराव पाटील यांचे ते नातू आहेत.त्याचे वडील ईश्वरराव



पाटील हे देखील सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय आहेत.

ॲड.चंद्रसेन पाटील हे दरवर्षी माळेगाव ता.लोहा येथे धनगर समाज मेळाव्याचे स्वागत अध्यक्ष व नियोजनात सक्रिय सहभाग घेतात. नागपूर, मुंबई,छत्रपती संभाजीनगर येथील आंदोलनाच्या नियोजनात सक्रिय सहभाग नोंदविला आहे.ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या लढ्यात त्यांचा सक्रिय सहभाग असतो.तसेच वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी काढलेल्या ओबीसी आरक्षण बचाव यात्रेचे माळेगाव व माळाकोळी येथे स्वागत व भव्य संभेचे यशस्वी आयोजन केले होते.ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या ओबीसी मोळाव्याचे लोहा येथे भव्य सभेचे आयोजन केले होते.

ॲड.चंद्रसेन पाटील सुरनर यांनी वंचित बहुजन आघाडी पक्षाकडे उमेदवारी मागितली होती. मात्र त्यांना पक्षाची उमेदवारी मिळाली नाही.परंतु ओबीसी बहुजन आघाडीने लोहा विधानसभा मतदारसंघातून ॲड चंद्रसेन पाटील सुरनर यांना उमेदवारी जाहीर केली आहे. पहिल्यांदाच ते लोहा विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. या आघाडीमध्ये ओबीसी बहुजन आघाडी, रिपब्लिकन सेना, बहुजन रिपब्लिक सोशॉलिस्ट पार्टी, लोकराज्य पार्टी,जनहित लोकशाही पार्टी आदी पक्ष सहभागी आहेत.

### आज भरणार उमेदवारी अर्ज

**ड.चंद्रसेन पाटील सुरनर हे आज मंगळवारी, दि.२९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता तुळजाई मंगल कार्यालय,शनि मंदिर,लोहा येथून भव्य विजय संकल्प रॅली काढून उमेदवारी अर्ज भरणार आहेत.**

### मान्यवर उपस्थित राहणार

**यावेळी रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांचे सुपुत्र आमन आंबेडकर,ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके,ओबीसी आरक्षणाचे आंदोलक नवनाथ वाघमारे आदींसह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहे**

# नाभिक महामंडळ केज ची कार्यकारिणी जाहीर



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**

केज तालुक्यातील नाभीक महामंडळाची बैठक केज येथे पार पडली .या बैठकीत सांगोपांग चर्चा होउन नवनियुक्त पदाधिकार्यांची निवड करण्यात आली ती खालीलप्रमाणे ,तालुका अध्यक्ष पदी नवनाथ दत्तात्रय टोपे व युवक अध्यक्षपदी अविनाश दिलीप काळे आणि कर्मचारी तालुका अध्यक्षपदी विजय शिंदे सर व उपाध्यक्षपदी अनिल ठोंबरे सर यांची निवड केज येथे पार पडलेल्या नाभिक महामंडळाच्या बैठकीमध्ये झाली. केज तालुक्यातील नवनियुक्त पदांची निवड मराठवाडा संघटक कविराज कचरे मराठवाड्याचे अध्यक्ष युवराज शिंदे युवक प्रदेशाध्यक्ष सुरेंद्र भैय्या कावरे जिल्हाध्यक्ष दिलीप झगडे. युवक जिल्हाध्यक्ष हरिष वाघमारे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष दीपक सुरवसे आदींच्या उपस्थितीत केज मध्ये पार पडली. यामध्ये जिल्हा संघटक पदी अनंतराव राऊत केज तालुका अध्यक्षपदी नवनाथ टोपे, तात्या टोपे युवक अध्यक्षपदी, अविनाश काळे कर्मचारी ,अध्यक्ष विजय शिंदे सर व उपाध्यक्ष अनिल ठोंबरे सर ,तालुका संघटक पदी संजय दळवी ,युवक तालुका कार्याध्यक्षपदी महादेव काटके ,युवक तालुका संघटक प्रमोद राऊत ,युवक शहराध्यक्ष दादासाहेब राऊत युवक तालुकाप्रमुख अशोक पवार व शहराध्यक्षपदी फेरनिवड मनोज काळे यांची करण्यात आली आहे अशा प्रकारे केज येथे बैठक घेऊन निवडीचा कार्यक्रम घेण्यात आला या बैठकीसाठी केज तालुक्यातील वडगाव, विडा, नांदूर ,पैठण ,बनकरांजा, होळ ,माळेगाव, साळेगाव, सातेफळ, पिंपरी, लाखा, सारणी सांगवी इत्यादी ठिकाणाहून समाज बांधवांची उपस्थिती लाभली.

# आजवर माधव माझा होता,आता तुमचा आहे, त्याला सांभाळा

## वंचितचे उमेदवार डॉ.विभुते यांच्या आईचे मतदारांना भावनिक आवाहन





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

अवघ्या पाच वर्षाचा माधव असताना त्यांच्या डोक्यावरील वडिलांचे छत्र हरवले त्यांना मी लहानाचं मोठं करून खुपचं कठीण परिस्थितीमध्ये घडविले आजवर माधव माझा होता आता तो तुमचा आहे त्याला सांभाळा असे भावनिक आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉक्टर माधव विभुते यांच्या मातोश्री श्रीमती अनुसयाताई विभुते यांनी मतदारांना केले. डॉ.माधव विभुते यांनी मोठे शक्ति प्रदर्शन करीत हजारोंच्या उपस्थित आपला उमेदवारी अर्ज दाखल करून नायगाव शहरातील अंबिका गार्डन येथे आयोजित केलेल्या जाहीर सभेच्या वेळी अँड.अविनाश भोसेकर, भगवानराव आचोंलीकर,भीमराव बेंद्रिकर,करुणाताई खंडेलोटे, धर्माबाद तालुकाध्यक्ष एकनाथ जिंकले,नायगाव तालुकाध्यक्ष, साहेबराव डोईवाड कोपरेकर, बालाजी रातोळीकर, साईनाथ नामवाडे, श्रीराम पाटील पवार, यांची प्रमुख उपस्थिती होती.

**नायगाव विधानसभेचे उमेदवार डॉ.माधव विभुते यांच्याकडे कोणीही वाकड्या नजरेने बघु नये त्यांच्या सोबत वंचित बहुजन आघाडीची ताकाद असून आता एसी,एसटी व ओबीसीची ताकत दाखवायची वेळ आली आहे यामुळे सर्व बहुजन समाजानी डॉ.विभुतेच्या पाठिमागे भक्कमपणे उभे राहुन आपली ताकत दाखवा.**

**-अविनाश भोसीकर.**

वंचित बहुजन अघाडीचे नेते ॲड बाळासाहेब आंबेडकर यांनी नायगाव विधानसभेसाठी लिंगायत समाजाला उमेदवारी देवून न्याय दिला यामुळे अशी संधी आता कधी येणार नाही लिंगायत समाजानी रस्त्यावर उतरून वंचित आघाडीचा प्रचार करावा असे मत नायगाव विधानसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.माधव विभुते यांनी नायगाव येथील प्रचार सभेत व्यक्त केले.

'डॉ.माधव विभुते तुम आगे बडो' 'वंचित बहुजन अघाडीचा विजय असो' अश्या घोषणाने सभागृह दणाणुन गेला यावेळी पेंटर शिवाजी पवार,प्रभाकर घंटेवाड,राजु राचोटकर,दिपक गजभारे,माधव इंगळे,यासह असंख्य जनसमुदाय उपस्थित होता.तर प्रस्तावना साहेबराव कोपरेकर यांनी तर सूत्रसंचालन बालाजी रातोळीकर व आभार विजय आणेराये मानले.

# मुंबईत असुन देखील गांवाशी नाळ जोडलेली आहे त्याबद्दल तुमचे कौतुक-माजी आ.भीमराव धोंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी पाटोदा शिरूर हे तालुके कायमस्वरूपी दुष्काळी आहेत त्यामुळे या भागातील लोक शहराकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होतात,शहरात येऊन स्थायिक झाले तरी आपण आपल्या गांवाशी नाळ जोडलेली आहे हि बाब तुमच्या दृष्टीने अतिशय कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले.

याबाबत अधिक माहिती अशी की,मुंबई,पनवेल परिसरात विविध व्यवसाय आणि काम धंद्याच्या तसेच नौकरीच्या निमित्ताने रहात असलेल्या आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील मायबाप जनतेशी संवाद साधण्यासाठी रविवारी माजी आ. भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली नविन पनवेल येथे स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्ती गर्जे हे होते.यावेळी व्यासपीठावर नगरसेवक काकासाहेब कुत्तरवडे,राजेंद्र वनवे,बबनराव बारगजे,मच्छिंद्र झगडे,भारत गर्जे,सरपंच सुरेश गोल्हार,माजी सरपंच बाळासाहेब पवार,गोपिनाथ मुंडे,सरपंच अभय गर्जे,सरपंच ज्ञानेश्वर वाघ,हरिदास वनवे, विकी शेकडे,संतोष आमले, सुभाष आंधळे,सुधाकर गर्जे,संदीप गर्जे,आदेश निमोणकर व इतरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले की, आपला मतदारसंघ दुष्काळी आहे.त्यामुळे आपल्या भागातील हजारो लोक मुंबई,पनवेल,पुणे, सुरत,संभाजीनगर अशा मोठ्या शहरात काम धंद्याच्या निमित्ताने स्थलांतरित होतात.परंतु त्यांनी आपल्या गावाशी नाळ तोडलेली






नाही हे अत्यंत महत्त्वाचे आहे. मी सर्व जातीं धर्माच्या लोकांसाठी काम करतो, मी कधीही जातीभेद केला नाही. आपल्या संस्थेत सर्व जाती धर्माचे लोक नोकरी करतात. मतदारसंघातील लोकांच्या आग्रहास्तव निवडणुक लढवत आहे.आपल्या भागातुन खेड्यापाड्यातील लोक इकडे येऊन ३० ते ४० कंटेनरचे मालक झालेत आणि त्यांचा वाहतुकीचा मोठा व्यवसाय यांचा मला खुप अभिमान वाटतो. काहीजण उच्चशिक्षित आहेत ते नोकरी करतात.काही तर अशिक्षित असुन सुद्धा इकडे येऊन जागा घेऊन त्यांनी घरे बांधली आहेत खरोखरच त्यांनी कष्टातून चांगली प्रगती केली आहे. लोकसभा निवडणुकीच्यावेळी एकदा स्व.गोपीनाथराव मुंडे उमेदवार होते.मतदारसंघातील फक्त मीच त्यांच्या सोबत होतो. मुंडे साहेबांचा वारसा आ. पंकजाताई यांनी चालवला आहे. लोकसभेला आ.पंकजाताई मुंडे यांचा झालेल्या पराभवाची सल मनात आहे.त्यांच्या विजयासाठी मी खुप प्रयत्न केला. मतदारसंघाच्या विकासासाठी संपूर्ण मतदारसंघाचा दौरा केला आहे.मी विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी अपक्ष उमेदवारी दाखल केली आणि मी निवडणुक लढवणारच आहे. गहिनीनाथ गड आणि विठ्ठल महाराज यांच्याशी माझं अतूट नातं आहे मी प्रत्येक वर्षी दिंडीत सहभागी होत असतो.अजुनही मतदारसंघातील बरेच गोरगरिब ऊसतोडणीसाठी जातात त्यांची ऊसतोड कायमची बंद करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.तुम्ही कुठल्याच बाबतीत घाबरु नका मी तुमच्या सोबत आहे.यावेळी आष्टी पाटोदा शिरूर तालुक्याच्या वतीने माजी आमदार भीमराव धोंडे यांचा सत्कार करण्यात आला.

युवा नेते अजयदादा धोंडे यांनी सांगितले की,आ.पंकजाताई मुंडे यांची मनापासून इच्छा होती की धोंडे साहेबांना उमेदवारी मिळावी.उमेदवारी मिळाली नाही तरी आपण सर्व ताकदीनिशी निवडणुकीला सामोरे जाणार आहोत.मुंबई व परिसरात रहात असलेल्या सर्वांनी मतदानाला येऊन साहेबांना सहकार्य करावे. लोकसभा मतमोजणीप्रसंगी आ. पंकजाताई ताई सोबत पालकमंत्री धनंजय मुंडे, वाल्मिक कराड आणि धोंडेसाहेबच होते.याप्रसंगी नगरसेवक काकासाहेब कुत्तरवडे,सरपंच सुरेश गोल्हार,भारत गर्जे,गोपिनाथ मुंडे व इतरांची भाषणे झाली. सुत्रसंचलन महारुद्र खेडकर यांनी केले.कार्यक्रमास पनवेल, मुंबई परिसरातील नागरिक उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904